# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## निदेश क्रमांक ८/२०१७.

**विद्यापीठ शिक्षकेतर पदांच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०१७.**

**( महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२ (८) मधील तरतुदी अंतर्गत निर्गमित)**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिंनाक १ मार्च २०१७ पासून लागु झालेला आहे.(महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७),

**आणि**

**ज्याअर्थी,** वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीसाठी लागू करण्यात आला आहे.

**आणि**

**ज्याअर्थी,**विद्यापीठ शिक्षकेत्तर पदाच्या सेवाप्रवेश आणि पदोन्तीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना इ. विषयी प्रक्रीया निर्धारीत करणारा निदेश, २०१६ ( निदेश क्र. १९८/२०१६) हा दिंनाक ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम १४ (८) अंतर्गत निर्गमित केला आहे आणि तो दिंनाक ११/११/२०१६ पासून लागु करण्यात आला होता.

**आणि**

**ज्याअर्थी,**निदेश क्र. १९८/२०१६ हा आज तारखेपर्यंत परिनियमामध्ये रुपांतरीत करण्यात आला नाही.

**आणि**

**ज्याअर्थी,**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२ (८) च्या परंतुकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार निदेश क्र. १९८/२०१६ ची परिणामकारकता दिंनाक १०/०५/२०१७ रोजी आपोआप समाप्त होणार आहे.

**आणि**

**ज्याअर्थी,**या निदेशामध्ये नमुद असलेला विषय परिनियमाद्वारे नियमित होणे आवश्यक आहे.

**आणि**

**ज्याअर्थी**,निदेश क्र.१९८/२०१६ चे रुपांतरण परिनियमामध्ये करण्यात आलेले नाही कारण विद्यापीठामध्ये 'सिनेट' नामक प्राधिकरण अस्तित्वात नाही.

**आणि**

**ज्याअर्थी**,निदेशाचे रूपांतरण परिनियमात केला जाण्याची प्रक्रिया वेळ खाऊ स्वरूपाची आहे.

**आणि**

**ज्याअर्थी**,निदेश क्र. १९८/२०१६ ची परिणामकारकता दिनांक १०/०५/२०१७ रोजी समाप्त होणार आहे.

**आणि**

**ज्याअर्थी**,निदेश क्र. १९८/२०१६ चे नुतनीकरण नविन निदेशामध्ये केले जाणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, डॉ. ना. व्यं. कल्याणकर, कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये निदेश क्र.१९८/२०१६ चे नुतनीकरण केले जाण्यासाठी खाली नमुद असलेले निदेश निर्गमित करीत आहे.

१. या निदेशाला **''विद्यापीठ शिक्षकेतर पदांच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव आाणि निवड समितीची रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित करणारा, निदेश,२०१७''** असे संबोधले जाईल.

२. हा निदेश,दि. १०/०५/२०१७ पासून अंमलात येईल.

३. महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र शासनाने शिक्षकेतर पदांच्या सेवाशर्ती नुसार सरळसेवा भरती व पदोन्नती विषयी वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन राजपत्र, शासन परिपत्रक, आदेश,विनियम इत्यादिंमधील तरतुदी आजही लागू असतील.

४. या निदेशाद्वारे **विद्यापीठ शिक्षकेतर पदांच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित** करण्यात आली आहे.

५. **गट—अ** पदांकरीता सरळसेवेसाठी वयोमर्यादा किमान ३० वर्षे व कमाल ४० वर्षे राहिल. परंतु मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता राहील. पदोन्नतीची पदे भरतांना, जे कर्मचारी सरळसेवेची शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत असतील त्यांना बिंदुनामावलीच्या क्रमानुसार पदोन्नती देण्यात येईल. कनिष्ठ पदावर कार्यरत जे कर्मचारी शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत नसतील मात्र त्यांनी वयाची ४५ वर्षे पुर्ण केले असतील